महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक ३७४(२)/यांत्रिकी/२०२१/१९** **दिनांक:- १६ मे, २०२३**

## - : प्रसिध्दीपत्रक : -

**विषय :-** महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा- २०२१
तात्पुरती शिफारस यादी व भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) सुविधेबाबत
**संदर्भ :-** मुख्य परीक्षा जाहिरात क्रमांक ०६६/२०२२, दिनांक १३ जुलै, २०२२.

महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२१ या परीक्षेची तात्पुरती शिफारस यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून त्याआधारे उमेदवारांकडून भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प मागविण्यात येत आहे.

२. प्रस्तुत परीक्षेची सदर तात्पुरती शिफारस यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असून उमेदवारांच्या अर्जामधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीअंती काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये / शिफारशीमध्ये बदल होऊ शकतो व पर्यायाने उमेदवाराचा गुणवत्ता क्रम बदलू शकतो, उमेदवार अपात्र ठरू शकतो.

३. प्रस्तुत तात्पुरती शिफारस यादी मा. न्यायालयात / मा. न्यायधिकरणामध्ये दाखल विविध न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आली आहे.

४. प्रस्तुत परीक्षेच्या भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES या मेनूमध्ये 'Post Preference / Opting Out' वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक १७ मे, २०२३ रोजी १२:०० वाजेपासून दिनांक २३ मे, २०२३ रोजी २३:५९ वाजेपर्यंत सुरु राहील. उमेदवारांकडून सदर विकल्प प्राप्त झाल्यानंतर आवश्यक तपासणीनंतर अंतिम गुणवत्ता यादी व अंतिम शिफारस यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

५. ऑनलाईन पध्दतीखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय ग्राहय धरला जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांची कोणतीही बाब / निवेदने / पत्रव्यवहार तद्नंतर विचारात घेतली जाणार नाहीत.

६. भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याच्या (Opting Out) विकल्पाधारे अंतिम निकाल / शिफारशीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. तसेच भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा विकल्प निवडणाऱ्या उमेदवारांचा अंतिम निकाल प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

७. भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (Opting Out) विकल्प सादर करण्यास कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा Support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर-राजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.